अपील अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल **aadmcgeneral@punecorporation.org**
माहितीचा अधिकार
अपिल क्र. २७/२०१८
जा.क्र उआ (सा.प्र.)/६४०२ दि. ०५/१०/२०१८

## अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय

अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/२७/२०१८

**श्री अमित रतिलाल कदम**
६०/०२ अ, पर्वती दर्शन,
पुणे ९

-------------------- अपिलार्थी

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,**
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल

**श्री अमित रतिलाल कदम** रा. ६०/०२ अ, पर्वती दर्शन, पुणे ९ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांचेकडे दि. ०९.०८.२०१८ रोजी अर्ज करून "अतिक्रमण विभागातील अतिक्रमण निरिक्षकाचे सन २००० ते आजपर्यंत बढतीने/ पदोन्नतीने भूमी व जिंदगी विभागात नेमणूक केली जात होती. परंतु आकृती बंध २०१४ नंतर त्यांचे मेंटेनन्स पदावर बढती देण्याचे कामकाज स्थगित केलेले असल्याने कारणे मीमांसा दर्शविणारे खालील आवश्यक ते अभिलेख माहिती मिळणे बाबत १) क्षेत्रीय अतिक्रमण पद निर्मिती करता मागणी प्रस्ताव सेवक, खातेप्रमुख, प्रशासन अधिकारी यांचे अभिलेख अहवाल प्रत २) स्थायी समिती, मुख्य सभा ठराव मान्यते बाबतचे अभिलेख, ३) आर. आर. मान्यते बाबत स्थापन केलेल्या समिती बाबतचा ठराव, समिती मध्ये सर्व विभागांचे जे बदल्याबाबत घेण्यात आलेले निर्णय ठराव अहवाल प्रत. बैठकी तील ईतीवृत्त प्रत ४) महाशासनाकडील नगरविकास विभागात मान्यतेकरिता ठेवण्यात आलेले प्रस्ताव प्रकरण अंतिम मुख्य सभेची मान्यता दिलेले अभिलेख ५) नव्याने आकृतीबंध २०१४ दुरुस्ती करिता मे. शासनाकडे पाठविण्यात आलेल्या प्रस्ताव अबिलेख प्रती (सर्व विभागांचे) ६) आर. आर. दुरुस्ती बाबत खातेप्रमुख/सेवक यांचा अभिप्राय घेतला आहे अगर कसे याचे अबिलेख मिळावेत असल्यास सर्व विभागांची अभिलेख प्रती मिळाव्यात." याबाबत माहिती मागितली होती.

अपिलार्थी यांचे मुळ अर्जातील माहिती बाबत आस्थापना विभागाने जा. क्र. जमाअ/आस्था/ ५५८६ दि. १०.०९.२०१८ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| ०९.०८.२०१८ | १०.०८.२०१८ | ०७.०९.२०१८ | १०.०९.२०१८ | ३ |

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी दिलेले उत्तरावर अपील क्र. २७/२०१८ चा अपील अर्ज दि. १७.०९.२०१८ रोजी दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| १७.०९.२०१८ | २१.०९.२०१८ | ०८.१०.२०१८ | होय. | - |

सदर प्रकरणी दि. ०५.१०.२०१८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी **श्री अमित रतिलाल कदम** रा. ६०/०२ अ, पर्वती दर्शन, पुणे ९ हे उपस्थित होते व **श्री रवींद्र शेंडगे** जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे मनपा हे उपस्थित होते. अपिलार्थी यांनी त्यांचे प्रतिनिधी **श्री श्री शैलेंद्र प्रभाकर दीक्षित** यांची मदत घेतली.

## विवेचन

अपिलार्थी **श्री अमित रतिलाल कदम** व त्यांचे प्रतिनिधी **श्री शैलेंद्र प्रभाकर दीक्षित** यांनी प्रतिपादन केले की, माहिती मिळणेबाबत जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेले उत्तर उशिरा पाठविले असून माहिती मिळाली नाही. तर **श्री रवींद्र शेंडगे** जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुण महानगरपालिका यांनी जा. क्र. जमाअ/आस्था/ ५५८६ दि. १०.०९.२०१८ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे असे नमूद केले.

## आदेश

अपिलार्थी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुण महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांना त्यांचे मूळ अर्जाच्या अनुषगाने आवश्यक ती माहिती ७ दिवसात विनामुल्य उपलब्ध करून द्यावी. अपिल क्र. २७/२०१८ निकाली काढण्यात येत आहे.

(अनिल मुळे)
अपिलीय प्राधिकारी
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका